**नि.फौ.ख.क्र.२६९/२०१८.**
**महाराष्ट्र शासन वि. अंबादास व इतर.**

**<u>आदेश नि.क्र.१४.</u>**

१. अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४५१ प्रमाणे सदर गुन्ह्यातील जप्त केलेले जुनाट गंजलेले १६ पत्रे, दोन लोखंडी अँगल, लोखंडी शटर, एक लाकडी काउंटर आणि दोन लोखंडी रॅक परत मिळणेसाठी दाखल केला आहे. अर्जदाराचे कथन की, सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झालेला असून तपासामध्ये पोलीसांनी जप्त पंचनाम्यामध्ये जप्त केलेल्या साहित्याची नोंद घेतलेली आहे. सदरचे जप्त केलेले साहित्य हे पोलीस ठाण्यामध्ये पडलेले असून खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराने सदरील जप्त मुद्देमाल त्याच्या ताब्यात मिळण्याची विनंती केली आहे.

२. सरकारी वकिलांनी गुन्ह्यातील मुद्देमाल हा आरोपींच्या ताब्यातुन जप्त केलेला असल्यामुळे आरोपींचे म्हणणे आणि अर्जदाराने जप्त मुद्देमालाच्या मालकी बाबतची कागदपत्रे दिलेली नसल्याची नोंद घेवून योग्य ते आदेश करण्याची विनंती केली आहे. आरोपीच्या वकिलांनी अर्जदाराने मागितलेला मुद्देमाल हा आरोपींच्या ताब्यातुन जप्त केलेला असून अर्जदाराकडे मुद्देमालाच्या मालकीबाबतची कागदपत्रे नसून त्याने काल्पनीक अर्ज दाखल केलेला असल्यामुळे आणि प्रस्तुत प्रकरणामध्ये पुरावा झालेला नसल्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्ज व म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदाराने अर्जासोबत मालकी दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. तसेच आरोपींनी देखील मुद्देमाल त्यांच्या ताब्यातुन जप्त केल्याचे सांगून मुद्देमालाची मागणी केलेली नाही अथवा मालकी बाबतचा कोणताही पुरावा दिलेला नाही. आरोपीच्या वकिलांनी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या ***नथ्थुसिंग सितारामजी बुंदे वि. महाराष्ट्र शासन व इतर २०१० ऑल एमआर (क्रि.) ३२३४***

या न्यायनिवाड्याचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिवाड्यामध्ये मा. न्यायालयाने फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ४५२ प्रमाणे जप्त मुद्देमालाचा ताबा हा मुद्देमाल ज्याच्या ताब्यातुन जप्त केलेला आहे त्याच्या ताब्यात देण्यात येवून जप्त मुद्देमालाच्या अधिकार व मालकीबाबत कोणताही निर्णय केला जात नसल्याचा निष्कर्ष नोंदविलेला आहे.

४. प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार हा फिर्यादी असून त्याने दि.०४.०६.२०१८ रोजी आरोपींच्या विरोधात फिर्याद दाखल केली आहे. त्याचबरोबर दि.०३.०६.२०१८ रोजी फिर्यादीने आरोपींच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा देखील दाखल केलेला आहे. सदरच्या अदखपात्र गुन्ह्याच्या चौकशीमध्ये आरोपींनी टपरीमधील लाकडी काउंटर, दोन लोखंडी रॅक व पत्रे खोलून त्यांच्या शेतामध्ये ठेवल्याचे सांगितले आहे. यावरुन, अर्जदार मागत असलेल्या वस्तू आरोपींनी त्यांच्या शेतात ठेवल्याचे आणि त्या वस्तू प्रस्तुत गुन्ह्यातील घर झडती पंचनाम्याप्रमाणे आरोपींच्या ताब्यातुन जप्त केल्याचे दिसून येत आहे.

५. जरी मा.उच्च न्यायालयाने ***नथ्थुसिंग सितारामजी बुंदे वि. महाराष्ट्र शासन व इतर*** या न्यायनिवाड्यामध्ये जप्त मुद्देमालाचा ताबा हा ज्याच्या ताब्यातुन जप्त केलेले आहे त्याला देण्यात येत असून त्याच्या मालकीबाबतचा कोणताही निर्णय होत नसल्याचे सांगितले असले तरी, सदर न्यायनिर्णयामधील अपीलार्थी हा त्या गुन्ह्यातील आरोपी किंवा फिर्यादी नव्हता त्यामुळे अपील नामंजूर केलेले आहेत. परंतू, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार हा फिर्यादी असून जप्त मुद्देमाल हा आरोपींच्या ताब्यातुन जप्त केलेला आहे. आरोपींनी देखील त्यांच्या विरोधात अर्जदाराने दाखल केलेल्या अदखलपात्र गुन्ह्याच्या चौकशीमध्ये त्यांनी अर्जदाराने त्यांच्या जागेवरती टाकलेली टपरी काढून घेण्यास नकार दिल्यामुळे त्यांनी टपरी काढून त्यांच्या शेतामध्ये ठेवल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांनी जप्त मुद्देमालाच्या मालकीबाबतची कोणतेही कागदपत्रे दिलेली नसून त्याची मागणी देखील केलेली नाही. त्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ***सुंदरभाई देसाई*** या न्यायनिर्णयामधील

आदेशाप्रमाणे जप्त मुद्देमाल हा पोलीस ठाण्यात पडून खराब होण्या ऐवजी योग्य त्या अटी व शर्तीवर अर्जदाराच्या ताब्यात देण्याचे न्यायोचीत होईल, म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश.

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. ठाणे अंमलदार सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाणे यांनी गुन्हा क्र.१२१/२०१८ मध्ये जप्त साहित्य गंजलेले १६ पत्रे, दोन लोखंडी अँगल, लोखंडी शटर, एक लाकडी काउंटर आणि दोन लोखंडी रॅक रु.३६५००/- (छत्तीस हजार पाचशे फक्त) च्या सुपुर्तनाम्यावर अर्जदाराच्या ताब्यात द्यावा.

३. जप्त मुद्देमाल सुपुर्तनाम्यावर अर्जदाराच्या ताब्यात देण्यापूर्वी त्याबाबतचा पंचनामा करुन अर्जदाराच्या खर्चाने छायाचित्रे काढून अहवाल न्यायालयास सादर करावा.

४. अर्जदाराने ताब्यात घेतलेला मुद्देमाल खटला क्र.२६९/२०१८ च्या निकालापर्यंत गहाण, बक्षिस, दान, विक्री अथवा त्यामध्ये कोणताही बदल करु नये आणि खटल्याच्या अंतिम आदेशाचे पालन करावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by Ravi Pandurang Thore
Date: 2020.11.05 17:10:36 +0530

दिनांक : ०५.११.२०२०.
ठिकाण : सिल्लोड.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, सिल्लोड.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | K. P. Patil |
| Court | : | Shri. Ravi P. Thore<br>Judicial Magistrate First Class,<br>Court No.2, Sillod. |
| Date of Order | : | 05.11.2020. |
| Order signed by the presiding officer on | : | 05.11.2020. |
| Order uploaded on | : | 05.11.2020. |
| Signed by Digital Signature | : | 05.11.2020. |